महाराष्ट्र शासन
विद्युत निरीक्षक (सचिव, अनुज्ञापक मंडळ व उदवाहन निरीक्षक)
उद्योग,ऊर्जा,कामगार व खनिकर्म विभाग,प्रशासकीय इमारत,
३रा मजला,रामकृष्ण चेंबुरकर मार्ग,चेंबुर,मुंबई-४०० ०७१.

| | |
|---|---|
| ईमेल: eislbnlift.nrg-mh@gov.in | दुरध्वनी : ०२२-२५२८५९६७ |
| जा.क्र./विनि(सअमंवउनि)/तांत्रिक शाखा / 9063 / २०२४ | दिनांक:- 11/10/2024 |


# परिपत्रक

**विषय :-** विद्युत पर्यवेक्षक मायनिंगच्या माहे नोव्हेंबर २०२४ मध्ये घेण्यात येणाऱ्या परीक्षेबाबत.

**संदर्भ :-** भारत सरकार,श्रम एवं रोजगार मंत्रालय,खान सुरक्षा महानिदेशलय,पश्चिम अंचल,नागपूर यांचे पत्र क्र.पं.अं / विद्युत / ४६३९ / २०२४ / नागपूर / दिनांक १०/१०/२०२४

माहे नोव्हेंबर २०२४ मध्ये घेण्यात येणाऱ्या विद्युत पर्यवेक्षक मायनिंग परिक्षेमध्ये उमेदवारांना अर्ज भरणा करण्याचा दिनांक १४/१०/२०२४ हा देण्यात आलेला होता तसेच परीक्षा दिनांक २३/११/२०२४ व दिनांक २४/११/२०२४ असा होता.त्याअनुषंगाने भारत सरकार,श्रम एवं रोजगार मंत्रालय,खान सुरक्षा महानिदेशलय,पश्चिम अंचल,नागपूर यांस गतवर्षी प्रमाणे मायनिंग परीक्षेकरिता अर्ज केलेल्या उमेदवारांकरिता घेण्यात येणारी प्रश्नपत्रिका व मौखिक मुलाखत याबाबत विचारताना केली असता वरील संदर्भीय पत्रान्वये याबाबत केंद्रीय विद्युत प्राधिकरण (विद्युत पुरवठा व सुरक्षा संबंधी उपाययोजना) २०२३ मधील नियमान्वये असमर्थता दर्शविली आहे. तसेच केंद्र शासनाच्या अधिपत्याखाली कार्यरत असलेले मुख्य विद्युत निरीक्षक (विद्युत) यांचा याबाबत अभिप्राय मागविण्यात येत आहे. यास्तव माहे नोव्हेंबर २०२४ मध्ये घेण्यात येणारी विद्युत पर्यवेक्षक मायनिंग ही परीक्षा पुढील आदेशापर्यंत स्थगित करण्यात येत आहे.

(अभिजित ल.कस्तुरे)
विद्युत निरीक्षक
(सचिव, अनुज्ञापक मंडळ व उदवाहन निरीक्षक)
चेंबुर (पूर्व), मुंबई-७१

प्रत :- १) मुख्य विद्युत निरीक्षक,उ.ऊ.का व खनिकर्म विभाग,मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.
२) अधीक्षक अभियंता,उ.ऊ.का व खनिकर्म विभाग,मुंबई /पुणे/छ.संभाजीनगर/नागपूर यांना माहितीस्तव सविनय सादर.
३) सर्व सदस्य अनुज्ञापक मंडळ यांना माहितीस्तव सविनय सादर.
४) कार्यालीन नस्ती/जावक नस्ती.